माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / २२० / २०२६ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विष्णु शंकर चोरमले	निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय माण (दहिवडी), जि. सातारा.	तहसिलदार, तहसिल कार्यालय माण (दहिवडी), जि. सातारा.

(सुनावणी दिनांक - ३० / ०९ / २०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १४.०१.२०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हजर आहेत, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	माहितीचा तपशील
०८.०९.२०२५	मौजे पिंगळी बुद्रुक (ता. माण, जि. सातारा) येथील जमीन मालकाने कुळ कायदा कलम ८८ सी प्रमाणे दाखल केलेल्या कलम ३३ ब (केस क्र. ३३ बी/३१/२००० किंवा ११/६१) अन्वये चाललेल्या खटल्या/केस मधील कामकाजाचा रोजनामा (Daily Order Sheet) व संबंधित आदेशाची नक्कल मिळणेबाबत.

विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता द्वितीय अपील सुनावणीस गैरहजर आहेत, ही बाब गंभीर स्वरुपाची आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचा निष्कर्ष काढून प्रथम अपील निकाली काढले आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती आढळून येत नसल्याचे कळविले आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०३.११.२०२५ रोजीच्या पत्राने "मागणी केलेल्या कागदपत्रांचा अभिलेख कक्षात शोध घेतला असता आढळ होत नाही, त्यामुळे मागणी केलेली माहिती पुरवता येत नाही" असे सांगून अर्ज निकाली काढला आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वरवरचा व मोघम आदेश पारित केला. जन माहिती अधिकारी यांनी कागदपत्रे "आढळत नाहीत/सापडत नाहीत" असे सांगून जबाबदारी झटकली आहे. शासकीय अभिलेख जतन करणे आणि शोधणे ही संबंधित कार्यालयाची जबाबदारी आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना अभिलेख शोधून माहिती देण्याबाबत कसलेही स्पष्ट निर्देश दिले नाहीत किंवा अभिलेख नष्ट झाला असल्यास त्याबाबतचा विशिष्ट दाखला/आदेश सादर करण्यास सांगितले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १२.१२.२०२५ रोजी पारित केलेला आदेश माहिती अधिकार कायद्याशी सुसंगत नाही. त्यामुळे तो रद्द करण्यात येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय माण (दहिवडी), जि. सातारा यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेल्या माहितीचा अभिलेखात शोध घेऊन, आढळ झालेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व आयोगास पूर्तता अहवाल सादर करावा. अभिलेखात शोध घेऊन माहिती आढळ न झाल्यास तसे प्रतिज्ञापत्र आयोगास सादर करावे व त्याची एक प्रत अपिलार्थीस पुरवावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. २२० / २०२६ / सातारा 449 2/2026 दिनांक - 14/1/2026